# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७८०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/११/२०१७

## १) विष प्राशन करुन युवकाचा मृत्यु .:–

दिनांक २१/११/२०१७ चे १६.०० ते २२/११/०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक रमेश परसराम भांडारकर वय ४० वर्ष, रा. माडगी याचेवर विवीध सहकारी पतसंस्था माडगी येथील कर्ज असल्याने त्या कर्जाला कंटाळुन मृतकने स्वत:चे शेतात जावुन विष प्राशन केल्याने मरण पावल्याने फिर्यादी सतिश गोपाल ठवरे वय २७ वर्ष रा. माडगी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बिसने पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

## २) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु .:–

दिनांक १९/११/२०१७ चे २१.३० वाजता दरम्यान यातील मृतक दिनेश ताराचंद लाटकर वय ३२ वर्ष, रा. जामगाव यास पोटाचा गंभिर आजाराचा त्रास असल्याने त्यास औषधोपचारा करीता डॉ. व्यास लक्ष हॉस्पीटल भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक १९/११/२०१७ चे २१. ३० वाजता दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र जा. क्र. ६६६९/२०१७ दिनांक २०/११/२०१७ अन्वये प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. जाधव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

## ३) वैनगंगा नदीचे पाण्यात इसमाचा मृत अवस्थेत मिळुन आला. .:–

दिनांक १९/११/२०१७ चे २३.०० वाजता पासुन ते दिंनाक २२/११/२०१७ चे ०९.०० वाजता पर्यत यातील मृतक सुरेश बलदेव बावनकर वय २४ वर्ष, रा. पालगाव हा दिनांक १९/११/२०१७ ला २३.०० वाजता दरम्यान घरुन निघुन गेला होता फिर्यादी व मृतक यांच्या कुंटबीयांनी त्याचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. व दिनांक २२/११/२०१७ चे ०९.०० वाजता दरम्यान मासोळी पकडणारा ढिवर यांनी वैनगंगा नदीचे पात्रात सालेबर्डी शेत शिवारात १ ईसम पाण्यामध्ये मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादीस कळविल्याने फिर्यादीने जावुन पाहीले असता मृतकला ओडखले वरुन फिर्यादी प्रविण भागवतजी बावनकर वय २४ वर्ष, रा. पालगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) औषधोपचारा दरम्यान मुलींचा मृत्यु .:—**

दिनांक २०/११/२०१७ चे ०५.३० वाजता दरम्यान यातील मृतक कु. नेहा विश्वनाथ लंजे वय १७ वर्ष, रा. पिंडकेपार हिची प्रकृती बिघडल्याने तीला औषधोपचार करीता नागुपर मेडीकल कॉलेज येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. धंतोली नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टे जा. क्र. १३९५/१७ दिनांक २२/११/२०१७ अन्वये पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. बांते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फुकट पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) विष प्राशन करुन औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु .:—**

दिनांक २०/११/२०१७ चे १६.०० वाजता दरम्यान यातील मृतक श्रीमती आशा जगदिश पाटील वय ५० वर्ष, रा. भेंडाळा हिने दिनांक १५/११/२०१७ ला विष प्राशन केल्याने तिला औषधोपचारा करीता ग्रा. रु. पवनी येथे नेवुन प्रथम उपचार करुन तेथील डॉ. ने पुढील उपचारा करीता रेफर केल्याने तीला सा.रु.भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिंनाक २०/११/२०१७ ला मरण पावल्याने पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र आज दिनांक २२/११/२०१७ ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. ना. कळपते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २२/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०५ तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व ईतर वाहनांवरती ११७ केसेस करण्यात आलेले आहे.

**(मपोउपनी. प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.